जनता शिक्षण संस्थेचे

# किसन वीर महाविद्यालय, वाई



आंतरराष्ट्रीय भरडधान्य वर्ष २०२३

# कृष्णाई

सन २०२२-२३



# संपादन समिती

प्रमुख संपादक

- **प्राचार्य डॉ. गुरुनाथ फगरे**

कार्यकारी संपादक

- **डॉ. बाळकृष्ण मागाडे**

सहसंपादक

- **डॉ. धनंजय निंबाळकर** : मराठी
- **डॉ. अरुण सोनकांबळे** : हिंदी
- **डॉ. बाळकृष्ण मागाडे** : इंग्रजी
- **सौ. दीक्षा मोरे** : संस्कृत
- **डॉ. राहुल वळीव** : विज्ञान
- **सौ. दिपाली चव्हाण** : वाणिज्य
- **डॉ. शिवाजी कांबळे** : कलादालन

मुखपृष्ठ संकल्पना व मांडणी

- **प्राचार्य डॉ. गुरुनाथ फगरे**
- **डॉ. बाळकृष्ण मागाडे**
- **आकाश धुमाळ**

कार्यालयीन सहाय्यक

- **श्री. रघुनाथ शेलार**
- **श्री. दिलीप जाधव**
- **श्री. अशोक जमदाडे**

# कृष्णाई

**सन २०२२-२३**






## संपादकीय

# कृष्णातीरावरून...



**नमस्कार,**

आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या सृजनात्मक आविष्काराचे 'कृष्णाई' २०२२-२३ हे वार्षिक नियतकालिक आपल्यासारख्या रसिक वाचकांच्या हाती सुपूर्द करताना मला मनस्वी आनंद होत आहे.

हे नियतकालिक महाविद्यालयातील विद्यार्थी लेखक व कलावंतांचं बागडण्याचं आणि मुक्तपणे त्यांच्या साहित्यातून व्यक्त होण्याचं हक्काचं प्रांगण आहे. आजचा विद्यार्थी लेखक आणि कलाकार उद्याच्या भारताचा भाष्यकार आहे. म्हणून समाजाचे प्रश्न, गरजा, विचार, पर्यावरण समस्या, भावभावना, देशहीत चिंतन आणि समीक्षा असे विविध पैलू असणारे लेखन त्यांनी मराठी, हिंदी, इंग्रजी आणि संस्कृत भाषेत केलेले आहे. हे तरुण लेखक आपल्या लेखनातून विवेकशीलता, मानवतावाद आणि विश्वबंधुत्व इत्यादी भावनांचे महत्त्व पटवत कृष्णाईच्या अंतरंगाचा मुख्य भाग बनताना दिसतात. या नियतकालिकामध्ये मराठी विभागातील 'मन', 'आई' आणि 'काळजाचा दगड' या कविता मनाचा ठाव घेतात. खरंच युद्ध हा प्रेमाचा, शांततेचा अगर सामंजस्याचा मार्ग नसतो हे 'रशिया आणि युक्रेन युध्दाचे परिणाम' या वैचारिक लेखात प्रकर्षाने दिसून येते. 'भरडधान्याचे महत्त्व' हा लेख भरडधान्याचे आहारातले नित्य सेवन हे किती आरोग्यासाठी फायदेशीर असते यावर प्रकाश टाकतो. परंपरेच्या दगडाखाली दबलेलीही मी स्त्री नाही अगर आधुनिक व्यवहाराच्या बाजारात उभी केलेलीही मी स्त्री नाही, तर मी एक जबाबदार स्त्री आहे, अशी विविध रूपे 'स्त्रीची बदलती रूपे' या लेखात प्रतिबिंबित होतात. हिंदी विभागातील 'आरक्षण के जनक छत्रपति शाहू महाराज', 'शिवनेरी किला' आणि 'सम्राट अशोक' हे लेख सामाजिक आणि ऐतिहासिक घटनांना उजाळा देतात व पुढे आदर्शवत मार्गक्रमण करण्याची दिशा देतात. नाजूक नात्यांचे आणि निरागस बालपणाचे भाव हिंदी कवितांमधून ठळकपणे उमटलेले दिसतात. इंग्रजी विभागातील *"Wildfire: So Wild'* ही एकांकिका माणसाच्या निष्काळजीपणामुळे पर्यावरणाची कशी अतोनात हानी होते याची प्रचिती देते, तर *"Gopya in a Saree'* हा लेख अस्सल ग्रामीण विनोदाचा तडका देवून जातो. अलीकडे शिक्षण क्षेत्रात आमूलाग्र बदल होत आहेत. 'नवीन शैक्षणिक धोरण २०२०' अमलात आणण्याची प्रक्रिया वेगाने सुरु आहे. *"NEP 2020: Challenges and Opportunities"* या लेखात पुढे शिक्षणक्षेत्रात येणारी आव्हाने आणि संधी काय असतील यासंदर्भात सखोल विवेचन केलेले आहे. भारतीय संस्कृती ही एकमेकांविषयी ओढ असणाऱ्या कुटुंबसंस्थेमुळे सर्वश्रेष्ठ मानली जाते. आज ती कुटुंबसंस्था 'लिव्ह-इन-रिलेशनशिप', 'ब्रेक अप' यासारख्या संकुचित मनोवृत्तीमुळे उद्‌ध्वस्त होत आहे. ती भीती *"Do Not Get Divorce'* या कवितेत व्यक्त झालेली जाणवते. लेखणीबरोबरच रेखाचित्रे या कलाप्रकारात विद्यार्थ्यांची त्यांच्या कलेतील नाविण्यपूर्णता स्पष्टपणे दिसून येते.

**'उजळावया आलो वाटा'** हे ब्रीद घेऊन देशभक्त किसन तथा आबासाहेब वीर यांनी आपल्या सर्व विश्वासू सहकाऱ्यांसोबत जनता शिक्षण संस्थेची स्थापना केली. त्यांनी त्याग आणि निःस्पृह भावनेतून उच्चशिक्षणाची सुविधा वाई तालुक्यातील तरुणांसाठी निर्माण केली. आजपर्यंत त्यागाचे तत्त्व जोपासणाऱ्या संस्थेमध्ये प्राध्यापक म्हणून तसेच 'कृष्णाई' अंकाचा कार्यकारी संपादक म्हणून काम करण्याचे भाग्य मला मिळाले, याचा सार्थ अभिमान वाटतो. आज हीरक महोत्सवी महाविद्यालयाचा टप्पा उजळपणे पार

करताना या महाविद्यालयाने अनेक विद्यार्थ्यांना अधिकारी, व्यापारी, उद्योजक, कला, क्रीडा, साहित्य व विविध सामाजिक क्षेत्रात अग्रेसर बनण्यासाठी दर्जेदार शिक्षणाचा व अचूक मार्गदर्शनाचा भक्कम पाया घातला, याचाही मला सार्थ अभिमान आहे. आजपर्यंत प्रकाशित झालेल्या 'कृष्णाई' अंकांनी अनेकवेळा उत्कृष्ट अंकाचा दर्जा विद्यापीठ स्तरावर प्राप्त केला आहे. यावर्षीचा अंकही त्यास पात्र ठरेल, असा विश्वास आहे. हा अंक आकारास येण्यासाठी सहभागी झालेले सर्व विद्यार्थी लेखक, कलाकार, गुणवंत विद्यार्थी, राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना, विविध क्रीडा प्रकारांमध्ये विशेष गुणवत्ताप्राप्त विद्यार्थी व त्यांना मार्गदर्शन करणारे सर्व शिक्षक व क्रीडा संचालक यांचेही मी हार्दिक अभिनंदन करतो.

आपल्या देशात आणि अन्नसंस्कृतीत भरडधान्यांचा वापर नवा नाही. पुरातन काळापासून आपल्या आहाराचा ती भाग होती. मधल्या काही काळामध्ये ती जणू लुप्त झाली असे वाटत होते. परंतु आता नव्याने भारतालाच नव्हे, तर जगाला भरडधान्यांची ओळख पटू लागलेली आहे. २०२३ हे 'आंतरराष्ट्रीय भरडधान्य वर्ष' म्हणून सर्वत्र साजरे केले जात आहे. त्यामुळे आजच्या तरुणाई व सर्व वाचकांमध्ये आपल्या भारतीय संस्कृतीमधील जुन्या तत्त्वांचा आणि सत्त्वांचा जागर व्हावा, भारतीय आहाराविषयी त्यांच्यावरती सकस संस्कार व्हावेत, त्यांनी भरडधान्याचं महत्त्व जाणून घ्यावे आणि भरडधान्याच्या पोषक तत्त्वांच्या माहितीसंबंधी त्यांच्या मध्ये जागरुकता वाढावी याद्दष्टीकोनातून बी.एस्सी. भाग-३ मधील विद्यार्थी आकाश धुमाळ याने मा.प्राचार्य डॉ.गुरुनाथ फगरे सर व माझ्या मार्गदर्शनाखाली या अंकाचे मुखपृष्ठ रेखाटले आहे. त्याचबरोबर आजच्या तरुणाईला खेळातून प्रेरणा आणि ऊर्जा मिळावी हा मलपृष्ठ संकल्पनेचा उद्देश आहे.


या अंकाच्या निर्मिती व संपादनाचे काम करताना मला अनेकांचे प्रोत्साहन व पाठबळ लाभले. मला कार्यकारी संपादक म्हणून काम करण्याची संधी मा. प्राचार्य डॉ. गुरुनाथ फगरे सर यांनी दिली व मोलाचे सहकार्य केले, याबद्दल मी त्यांचे आभार मानतो. आमच्या जनता शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष आदरणीय प्रतापराव भोसले उर्फ भाऊ तसेच विद्यमान अध्यक्ष मा. श्री. मदनदादा भोसले, उपाध्यक्ष मा. श्री. शंकरराव गाढवे सर, संस्थेचे सर्व संचालक, सचिव डॉ. जयवंत चौधरी, खजिनदार प्रा. नारायणराव चौधरी यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करतो. नवीन स्थापित झालेल्या महाविद्यालय विकास समिती आणि पीएच्.डी. पदवी प्राप्त सहकारी प्राध्यापक बंधू भगिनीचे अभिनंदन करतो.

'कृष्णाई' अंक दर्जेदार व माहितीपूर्ण करणेसाठी मला सहकार्य करणारे विभागीय सहसंपादक डॉ.धनंजय निंबाळकर, डॉ.शिवाजी कांबळे, डॉ.राहुल वळीव, डॉ.अरूण सोनकांबळे, सौ.दिक्षा मोरे, सौ.दिपाली चव्हाण यांचे विशेष आभार मानतो. तसेच कला शाखेचे उपप्राचार्य प्रा.(डॉ.) सुनील सावंत, विज्ञान शाखेचे उपप्राचार्य प्रा.(डॉ.) ज्ञानदेव झांबरे, वाणिज्य शाखेचे उपप्राचार्य प्रा.(डॉ.) विनोद वीर, कार्यालयीन अधिक्षक श्री.रघुनाथ शेलार, श्री.दिलीप जाधव, श्री.अशोक जमदाडे, इंग्रजी विभागातील माझे सर्व सहकारी आणि मला विविध प्रकारे सहकार्य करणारे सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांनाही धन्यवाद देतो.

कृष्णाईच्या मुद्रणाचे काम सुबक व सुंदर होण्यासाठी अविरत काम करणारे कलाविष्कार ग्राफिक्स्, साताराचे प्रमुख श्री.कृष्णा चिंचकर व त्यांचे सहकारी यांना धन्यवाद देतो. विविधतेने नटलेला हा अंक आपणा सर्वांच्या पसंतीस नक्कीच उतरेल, अशी प्रांजळ अपेक्षा व्यक्त करतो.

धन्यवाद!

**डॉ.बाळकृष्ण मागाडे**
कार्यकारी संपादक



***The natural world is:***
***The greatest source of excitement;***
***The greatest source of visual beauty;***
***The greatest source of intellectual interest;***
***The greatest source of so much in life;***
***It is that makes life worth living.***

***- David Attenborough***

# English Section

**Dr.Balkrishna Magade**
Section Editor

# Index


**PROSE**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| Short Story | **A Wrong Decision** | Sakshi Yadav | B.A. III | 55 |
| One-Act-Play | **Wildfire: So Wild** | Neha Jaykar | B.Sc. III | 57 |
| Character Sketch | **Stephen Hawking** | Sanika Mojar | B.A. III | 59 |
| Humorous Writing | **Gopya in a Saree** | Anisha Ghadge | B.A. III | 62 |
| Travelogue | **My Visit to Shivaji University NSS Labour Camp** | Aditya Lahane | B.A. I | 65 |
| Intellectual Writing | **NEP 2020: Challenges and Opportunities** | Pranita Gaikwad | BCA I | 68 |
| Intellectual Writing | **Innovation and Technology for Gender Equality** | Yashaswini Chorage | B.Com II | 71 |
| Critical Writing | **Dystopic Vision in** *George Orwell's 1984* | Prachi Rajpure | BCA I | 73 |
| Informative Writing (General) | **Start up Entrepreneurship in India** | Anuja Yadav | BCA I | 77 |
| Informative Writing (Science) | **Global Warming** | Kiran Pangare | BCA I | 79 |
| Research Article | ***A Train to Pakistan:* Unheard Layers of Women's Exploitation** | Sanskruti Gangavane | B.A. III | 82 |

**POETRY**

| | | | |
|---|---|---|---|
| **Drown** | Suraj Sulke | BCA I | 81 |
| **Life: Inside and Outside** | Suhana Shaikh | B.A. I | 85 |
| **Do Not Get Divorce** | Mayuri Umbarkar | B.A. I | 86 |
| **Quinque Words** | Prasad Yadav | B.A. II | 87 |
| **Friend** | Aayesha Sayyad | B.A. II | 88 |

जनता शिक्षण संस्थेचे

# किसन वीर महाविद्यालय, वाई

ता.वाई, जि.सातारा

**'कृष्णाई २०२२-२३' दी प्रेस रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स नियम ८ प्रमाणे आवश्यक माहिती**


| | |
|---|---|
| प्रकाशन स्थळ | : किसन वीर महाविद्यालय, वाई |
| प्रकाशन काळ | : वार्षिक |
| प्रकाशकाचे नाव | : प्राचार्य डॉ.गुरुनाथ फगरे |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : किसन वीर महाविद्यालय, वाई, ता.वाई, जि.सातारा<br>दूरध्वनी : (०२१६७) २९९३२६ |
| संपादकाचे नांव | : डॉ.बाळकृष्ण मागाडे |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : किसन वीर महाविद्यालय, वाई, ता.वाई, जि.सातारा |
| मालकी | : किसन वीर महाविद्यालय, वाई |
| मुद्रकाचे नाव | : कलाविष्कार ग्राफिक्स्,सातारा.<br>मोबा.९५०३७८६२८ |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : २१, निसर्ग कॉलनी, जरंडेश्वर नाका, सदरबझार, सातारा |
| अक्षररचना | : कलाविष्कार ग्राफिक्स्,सातारा |
| राष्ट्रीयत्व | : भारतीय |
| पत्ता | : २१, निसर्ग कॉलनी, जरंडेश्वर नाका, सदरबझार, सातारा |


*या नियतकालिकातील मजकुराशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.*